MHWS080011562025

**<u>रे. मु. नं.८२/२०२५ मधील नि.क्र. २७ वरील आदेश</u>**

वादी क्र.०१ ते ०४ यांनी प्रस्तूतचा अर्ज प्रतिदाव्यास लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता व लेखी जबाब नाहीचा आदेश रदद होण्याकरिता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जातील वादी क्र.०१ ते ०४ यांचे कथनानुसार, दाव्यातील मूळ वादी क्र.०१ हे आजारी असल्याने व अन्य वादी क्र.०३ व ०४ हे त्यांचेसोबत दवाखान्यात असल्यामुळे तारखेवर हजर राहून मुदतीत प्रतीदाव्यास लेखी जबाब दाखल करता आला नाही. त्यामुळे आज रोजी प्रतिदाव्यास लेखी जबाब दाखल करत असून मूळ वादी विरुध्द झालेला दिनांक १२.०१.२०२६ रोजीचा लेखी जबाब नाहीचा आदेश रदद होउन लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

**०३.** सदर अर्जावर दाव्यातील प्रतिवादीचे लेखी म्हणणे नि.क्र.२८ वर दाखल केले. सदर म्हणण्यानुसार, मुळ वादी यांनी प्रतिवादीचे प्रतिदाव्यास व त्यातील ताकीद अर्जास लेखी जबाब व म्हणणे दाखल न केल्यामुळे दिनांक १२. ०१.२०२६ रोजी लेखी जबाब नाहीचा आदेश पारीत केलेला आहे. त्यामधील वादी क्र.०१ ते ०४ आजारी असल्याबाबत कोणतेही वैदयकीय प्रमाणपत्र जोडलेले नाही अथवा दिनांक १२.०१.२०२६ रोजी त्याबाबत कोणताही अर्ज केलेला नाही. त्यामुळे वादीचा अर्ज खोटा असल्याने तो खर्चासह खारीज करावा अशी विनंती केली.

**०४.** अर्ज वाचला. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तूतचा दावा कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदरकामी मूळ वादी क्र.०१ ते ०४ यांना पुरेशी संधी देउनही त्यांनी प्रतिवादींचे प्रतिदाव्यास लेखी जबाब दाखल केलेला नसल्याने दिनांक १२.०१.२०२६ रोजी विनाजबाब चौकशीचा आदेश पारित झाल्याचे दिसून येते. वादी क्र. ०१ ते ०४ यांनी अर्जात नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्या अभावी संयुक्तीक वाटत नाही. परंतु प्रतिदाव्याचे स्वरुप पाहता वादींना बचावाची संधी देणे नैसर्गीक न्यायतत्वानुसार आवश्यक आहे. त्यामुळे झालेल्या विलंबाबाबत ठराविक दंड आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**—: <u>आदेश</u> :—**

१ वादी क्र.०१ ते ०४ यांचा प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.२७ मंजूर करण्यात येतो.

२ वादी क्र.०१ ते ०४ यांनी लेखी जबाब सादर करण्यास झालेला विलंब त्यांनी प्रत्येकी रक्कम रू. १००/— चा दंड प्रतिवादींना देण्याच्या अटीवर माफ करणेत येतो. वादी क्र.०१ ते ०४ यांनी दिलेला लेखी जबाब, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्यानंतर प्रतिदाव्याच्या कामी सामील करुन घेण्यात येईल.

PRATAP VISHNU SAPKAL Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL Date: 2026.02.16 17:34:48 +0530

(पी. व्ही. सपकाळ)

दिनांक — १६.०२.२०२६ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर रिसोड

**<u>शेरा</u>**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग<br>न्यायदंडाधिकारी, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | एच.ए. उचाडे |
| निकाल तारीख | : | १६.०२.२०२६ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | १६.०२.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | १६.०२.२०२६ |